नियमीत दिवाणी दावा क्र.५९/२००८
शंकर व इतर वि. सावित्रीबाई व इतर

निशाणी क्र.१०७

सदर अर्ज वादीतर्फे दोन अतिरिक्त मुद्दे निश्चित करणेसाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, दावा, लेखी कैफीयत, नि.क्र.३८ व त्यावरील आदेश, इत्यादीचे अवलोकन केले.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदार वादींचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकत क्र.ब ही प्रतिवादी क्र.५ यास विक्री केली आहे, परंतु प्रतिवादी क्र.५ हा शेतकरी नाही. शेतजमीन खरेदी करणारा शेतकरी नसेल तर जिल्हाधिकारी यांची परवानगी घ्यावी लागते. याशिवाय दावा मिळकत क्र.१ ही खरेदी केल्यामुळे प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा तुकडा पडलेला आहे. त्यामुळे मुंबई जमीन तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबत अधिनियम १९४७ चे तरतुदीचे उल्लंघन झालेले आहे. शेवटी वादीने प्रतिवादी क्र.५ हा शेतकरी आहे का व खरेदीखताचे व्यवहाराने मुंबई जमीन तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबत अधिनियम १९४७ चे तरतुदीचे उल्लंघन झालेले आहे का? असे दोन मुद्दे निश्चित करण्याची विनंती केली.

५. समोरील बाजुचे थोडक्यात कथन असे की, अर्ज बेकायदेशीर आहे. वादीने यापुर्वी नि.क्र.९८ वर अर्ज केला आहे. त्यानंतर नि.क्र.९९ पुरसीस देवुन अनेक गोष्टी ज्या दाव्यात नाहीत त्या घुसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वादीचा पुरावा संपलेला आहे. प्रतिवादीचा सरतपास दि.

३०/१०/२०१४ रोजी संपलेला आहे. त्यानंतर वारंवार मुदत देवुन उलटतपास नाहीचा आदेश झाला. पुन्हा अर्ज देवुन उलटतपासाची परवानगी मागितली. त्यानंतर हा अर्ज दिलेला आहे. अर्जातील मागणीबाबत कोणतेही कथन नाही. त्यामुळे नवीन मुद्येची आवश्यकता नाही. शेवटी अर्ज खर्चासह नामंजुर करणेची विनंती केली.

६.     दाव्याचे बारकाईने अवलोकन केले. यापुर्वी अतिरीक्त मुद्ये निश्चित करणेकरीता नि.क्र.९८ वर वादींनी अर्ज दिला होता. त्याचवेळी वादीं अर्जातील मागणी करु शकले असते परंतु ती त्यावेळी केलेली नाही. याशिवाय अर्जात कथन केल्याप्रमाणे वादीचे वादपत्रात कथन दिसुन येत नाही. कथनाबाहेर जावुन मुद्ये निश्चित करण्याचे कारण नाही. तसेच वादमिळकत क्र.ब बाबत खरेदीखत वादींवर बंधनकारक आहे की नाही याबाबत नि.क्र.१९ वर मुद्या निश्चित आहे. तसेच वादीं वाटपास पात्र आहेत किंवा नाही हा देखील मुद्या निश्चित आहे. प्रतिवादी क्र.५ शेतकरी नसल्यामुळे व जमीनीचा छोटा तुकडा पडल्यामुळे खरेदीखत अर्थहीन होत असेल तर आपोआपच नि.क्र.१९ वरील मुद्या क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी येईल. अशा परिस्थितीमध्ये विनंतीप्रमाणे मुद्ये उपस्थित करण्याचे कोणतेही कारण नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्ज नामंजुर होणेस पात्र, करिता खालील आदेश.

## **आ दे श**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/—

दि.०९/०२/२०२३          (श.गि. दुबाले)

दि.न्या.क.स्तर, नांदगाव.